Smart करबचत

# 'आयडीएफसी' की 'एल अँड टी' इन्फ्रा बाँड्स?



राहुल मंत्री
posiview.response@esakal.com

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी वर्ष २०१०-११ च्या अर्थसंकल्पामध्ये कलम ८० सीसीएफच्या अंतर्गत वैयक्तिक करदात्यांसाठी अतिरिक्त वजावटीचा मार्ग उपलब्ध करून दिला. या कलमांतर्गत वैयक्तिक करदात्यांनी जर विशिष्ट इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्यांनी इश्यू केलेल्या इन्फ्रास्टक्चर बाँड्समध्ये गुंतवणूक केली, तर त्यांना २० हजार रुपयांची अतिरिक्त वजावट मिळू शकणार आहे. सुरवातीला हा पर्याय केवळ आर्थिक वर्ष २०१०-२०११ एवढ्यापुरताच मर्यादित ठेवण्यात आला होता; परंतु वर्ष २०११-१२ च्या अर्थसंकल्पात त्याला मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे यंदा देखील ३१ मार्च २०१२ पर्यंत गुंतवणूकदार इन्फ्रास्टक्चर बाँड्समध्ये गुंतवणूक करून २० हजार रुपयांपर्यंतच्या अतिरिक्त करबचतीचा लाभ मिळवू शकणार आहेत. कलम ८० सी च्या अंतर्गत मिळणाऱ्या एक लाख रुपयांपर्यंतच्या नेहमीच्या कर वजावटीच्या खेरीज ही जादाची वजावट वैयक्तिक करदात्यांना मिळू शकणार आहे.

च्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रवेश केला असल्याने आगामी चार-पाच महिन्यांत मोठ्या संख्येने नवीन बाँड्सचे इश्यू बाजारात येण्याची अपेक्षा आहे. सध्या आयडीएफसी आणि एल अँड टी इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स या दोन कंपन्यांनी कलम ८० सीसीएफच्या अंतर्गत अतिरिक्त वजावट मिळवून देणारे दीर्घ मुदतीचे इन्फ्रास्ट्रक्चर बाँड्स बाजारात आणले आहेत.

कोणत्याही बाँड्समध्ये गुंतवणूक करण्याआधी त्यांचे मूल्यांकन (रेटिंग) आणि कूपन रेट (व्याजदर) विचारात घेणे अत्यंत आवश्यक ठरते. मानांकनामुळे गुंतवणूकदारांना त्या बाँड्समधील गुंतवणुकीबाबत असलेल्या सुरक्षिततेची हमी मिळू शकते. म्हणजे असे, की 'एएए' रेटिंग असलेले बाँड्स हे 'एए प्लस' रेटिंग किंवा 'एए' रेटिंग असलेल्या बाँड्सच्या तुलनेत निश्चित अधिक सुरक्षित असतात. आयडीएफसी बाँडस्चे मानांकन 'एएए' आहे, तर एल अँड टी इन्फ्रा. फायनान्स कंपनीच्या बाँड्सचे मानांकन 'एए प्लस' आहे. या दोन्ही कंपन्यांनी ९ टक्के कूपन रेटला बाँड्स उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे अधिक मानांकन म्हणजे अधिक सुरक्षितता हा नियम लक्षात घेता, एल अँड टी इन्फ्राच्या तुलनेत आयडीएफसी बाँड्समध्ये गुंतवणूक करणे हे नक्कीच अधिक श्रेयस्कर आहे. याचा अर्थ असा अजिबात नाही, की एल अँड टी आपल्या बाँड्सबाबत काही कमी दर्जाची कामगिरी करन दाखवेल. मूल्यांकन असे दाखविते, की सध्याच्या परिस्थितीमध्ये व्याजाचा परतावा आणि प्रमुख जबाबदारी यांचा विचार करता एल अँड टीच्या तुलनेत आयडीएफसीचे स्थान हे अधिक भक्कम आहे.

दोन्ही कंपन्यांचे बाँड्स फिजिकल तसेच डी मॅट दोन्ही पर्यायात उपलब्ध आहेत, तसेच या बाँड्सची नोंदणी नामांकित शेअर बाजारांवर होणार आहे.

**आयडीएफसी आणि एल अँड टी इन्फ्रा बाँड्सची तुलना**

| वैशिष्ट्ये | आयडीएफसी | एल अँड टी इन्फ्रा |
|---|---|---|
| कूपन रेट | ९ टक्के | ९ टक्के |
| मानांकन | AAA | AA+ |
| दर्शनी मूल्य | रु. ५००० | रु. १००० |
| ॲलॉटमेंट | फिजिकल/ डी मॅट | फिजीकल /डी मॅट |
| नोंदणी | एनएसई/बीएसई | बीएसई |
| कालावधी | १० वर्षे | १० वर्षे |
| फेरखरेदी पर्याय | ५ वर्षानंतर | ५ आणि ७ वर्षानंतर |

गुंतवणुकीतून दोन्हीपैकी कोणत्याही पर्यायाचा अवलंब करून बाहेर पडता येते. दोन्ही कंपन्यांनी पाच वर्षानंतर फेरखरेदीचा पर्याय ठेवलेला आहे. एल अँड टीने तर फेरखरेदीसाठी सात वर्षाचा अतिरिक्त कालावधी देऊ केला आहे; तसेच 'एएए' मूल्यांकन असलेल्या बाँड्सचा व्यवहार हा 'एए प्लस' मूल्यांकनाच्या बाँड्सच्या तुलनेत निश्चितपणे अधिक जास्त प्रीमियमवर होतो. एल अँड टीच्या तुलनेत आयडीएफसी बाँड्सना गुंतवणूकदारांनी का प्राधान्य द्यावे, याचे हे अजून एक कारण आहे. एल अँड टीचे बाँड्स एक हजार रुपये प्रारंभिक गुंतवणूक व त्यानंतर एक हजाराच्या पटीत गुंतवणूक करून मिळू शकणार आहेत, तर आयडीएफसीने बाँड्ससाठी पाच हजार रुपये प्रारंभिक गुंतवणूक व त्यानंतर पाच हजाराच्या पटीत गुंतवणूक असा पर्याय ठेवला आहे. त्यामुळे, ज्या गुंतवणूकदारांना एक हजाराच्या पटीत गुंतवणूक करायची आहे, त्यांनी एल अँड टीचा पर्याय निवडावा व पाच हजारांच्या पटीत गुंतवणूक करण्याची इच्छा असलेल्यांनी आयडीएफसी